# फळसेवाडी हितकारी संस्था

## कै प्रताप विठोबा राणे यांच्या मृत्यूसंबधी शोकसभा (मृत्यू दिनांक 20-09-2002)

**दिनांक** : रविवार 27 ऑक्टोबर 2002
**स्थळ** : शिरोडकर हायस्कुल, परेल

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री दत्ताराम विष्णु साटम | 16. श्रीमती रुचिरा राजन सावंत |
| 2. श्री अविनाश कृष्णाजी राणे | 17. श्री श्रीकांत प्र राणे |
| 3. श्री साबाजी त्रिंबक राणे | 18. श्री अशोक दत्ताराम राणे |
| 4. श्री रघुनाथ भगवान राणे | 19. श्री सुरेश द राणे |
| 5. श्री रामचंद्र भगवान राणे | 20. श्रीमती कामिनी सावंत |
| 6. श्री विनोद विठोबा राणे | 21. श्रीमती मंजू विजय कोरगावकर |
| 7. श्री रंजन रावजी म्हसकर | 22. श्रीमती शोभा सुरेश राणे |
| 8. श्री विलास पुंडलिक राणे | 23. श्री धोंडू रघुनाथ राणे |
| 9. श्रीमती प्रितम स सकपाळ | 24. श्री भास्कर दौलत राणे |
| 10. श्रीमती चारुशिला मंगेश राणे | 25. श्री दिलिप मधुकर राणे |
| 11. श्रीमती अल्पना वि राणे | 26. श्री गुरुनाथ धोंडू राणे |
| 12. श्री प्रभाकर श्रीधर राणे | 27. श्री जयवंत नाना राणे |
| 13. श्री मधुसुदन श्रीधर राणे | 28. श्री उदय भगवान राणे |
| 14. श्री झिलू राजाराम राणे | 29. श्री हेमंतकुमार रमेश राणे |
| 15. श्रीमती पुनम प्रताप राणे | 30. श्री शंकर बाळकृष्ण राणे |

फळसेवाडी हितकारी संस्था विशेष सभा शनिवार दिनांक 27ऑक्टोबर 2002 रोजी शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई – 400 012 येथे संपन्न झाली. या सभेस पुरुष व महिला मिळून 30 सभासद / बिगर सभासद होते. या सभेचा मुख्य विषय कै प्रताप विठोबा राणे (मृत्यू दिनांक 20 सप्टेंबर 2002) यांस श्रध्दांजली असा होता. या सभेस 5:30 वाजता सुरवात करण्यात आली. या सभेस अध्यक्ष म्हणून श्री अविनाश कृष्णाजी राणे यांची नियुक्ती करण्यात आली.

अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत केले नंतर कार्यक्रमास सुरवात झाली. प्रथम कै प्रताप विठोबा राणे यांच्या तसबीरीस संस्थेचे जेष्ठ सदस्य श्री दत्ताराम विष्णु साटम यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आली. त्यानंतर सभेच्या अध्यक्षांनी अगरबत्ती लावून अभिवादन केले व सर्व उपस्थित व पुरुष सदस्यांनी कै प्रताप वि राणे यांच्या प्रतिमेस फुले वाहून आपली भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

या शोकसभेनिमित्त आपले जेष्ठ सभासद श्री साबाजी त्रिंबक राणे व श्री अविनाश कृष्णाजी राणे यांनी समयोचित भाषण (दोन शब्द) सभाग्रहात केले.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-02-(25 to 28)

यानंतर चिटणीसांनी संस्थेच्या अध्यक्षांच्या परवानगीने सर्व सभाग्रहास असे सांगितले की कै प्रताप विठोबा राणे आपल्या या संस्थेचे गेले 12 वर्षे अध्यक्ष होते. त्यांच्या धडाडीमुळे व माननिय मुख्यमंत्री श्री नारायणराव राणे यांच्या सहकार्यामुळे वाडीतील बऱ्याचश्या समस्या मार्गी लागल्या व काही लागायच्या आहेत. आपली संस्था ही धर्मदाय आयुक्त मुंबई यांचेकडे नोंदणी केलेली आहे. अश्यावेळी अध्यक्ष आपल्यातून निघून गेलेले आहेत. अश्यावेळी ही संस्था पुढे कश्याप्रकारे चालवायची यासाठी सभेला मार्गदर्शन करावे अशी विनंती केली. यावेळी सभेच्या अध्यक्षांनी सुचविलेल्या सुचनेप्रमाणे सध्याचे उपाध्यक्ष श्री रामकृष्ण भगवान राणे यांनी अध्यक्ष कारभार स्विकारावा व लवकरच या संस्थेची सर्वसाधारण सभा बोलवावी व या सभेमध्ये पुढील कार्यकारी मंडळ ठरवावे. या निवडीनंतर संस्थेच्या वाटचालीबद्दल विचार व्हावा, यास सर्व सभाग्रहाने एकमताने मान्यता दिली. याच अनुशंगाने अध्यक्षांच्या परवानगीने असे ठरले की ही सभा 15 डिसेंबर रोजी घेण्यात यावी. या दृष्टीने एक स्पष्ट परीपत्रक काढावे व सभासदांना मिटींगसाठी बोलावून संस्थेचे कार्य चालू ठेवायचे की कसे, कोणत्या पद्धतीने याचा स्पष्टपणे उल्लेख व्हावा अशी विनंती करण्यात आली. या दृष्टीने वाटचाल करण्याचे ठरले.

कै प्रताप वि राणे यांच्या बरोबर वाडीतील आपल्यातून निघून गलेल्या (कालवश झालेल्या) खाली सभासदांना देखील भावपूर्ण श्रध्दांजली दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून देण्यात आली (1) कै नाना आबाजी राणे (2) कै सुमती संभाजी राणे (3) कै राधाबाई कृ राणे (4) कै लिलावती अंनत राणे (5) कै भास्कर दत्ताराम साटम (6) कै विठोबा नाना राणे (7) कै बाळकृष्ण आबाजी राणे (8) कै महिपत त्रिंबक राणे (9) कै रत्नाकर बाळकृष्ण राणे (10) कै प्रभावती नाना राणे (11) कै सविता वामन राणे (12) कै महादेव गंगाराम राणे (13) कै _____ महादेव राणे.

यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

---